| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २४५ वा | शुक्रवार दिनांक १२ डिसेंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### धाराशिव पोलिसांची अवैध मद्य विरोधी कारवाई

तामलवाडी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत -मीरा रा. सावरगाव ता. तुळजापूर जि. धाराशिव या दि.१०.१२.२०२५ रोजी आपल्या राहत्या घरासमोर सावरगाव येथे अंदाजे ३,००० किंमतीची ३०लिटर सिंधी ताडी अम्ली द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. तर मंगल रा. सावरगाव ता. तुळजापूर जि. धाराशिव या दि.१०.१२.२०२५ रोजी आपल्या राहत्या घरासमोर सावरगाव येथे अंदाजे ९०० किंमतीची ०९लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये तामलवाडी पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

### कडदोरा शिवारातून मोटारसायकलची चोरी

मुरुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी गोविंद उत्तम कोरे, वय ४२ वर्षे, रा.लोहाटा ता. औसा जि.लातुर यांची अंदाजे ४०,००० किंमतीची मोटरसायकल कडदोरा शिवारात प्रविण तवार यांचे हॉटेल जवळ रोडचे कडेवरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-गोविंद कोरे यांनी दि.१०.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन मुरुम पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### राहात्या घरासमोरुन मोटारसायकलची चोरी

तामलवाडी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नवनाथ भैरु सोनवणे, वय २९ वर्षे, रा. सावरगाव ता. तुळजापूर जि.धाराशिव यांची अंदाजे ३०,००० किंमतीची मोटरसायकल नवनाथ सोनवणे यांचे राहते घरासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- नवनाथ सोनवणे यांनी दि.१०.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तामलवाडी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### १६ बॅटरी व ५०८ मिटर पॉवर केबलची चोरी

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.०२.०६.२०२५ रोजी इंडस टॉवर पाडी शिवार गोजवाडा पिंपळगाव तांदुळवाडी डोकेवाडी विजोरा शिवारातील अमर राजा व्ही ६०० ए.एच. कंपनीच्या १६ बॅटरी व ५०८ मिटर पॉवर केबल असा एकुण १६,००० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- महादेव पंडीत ढवण, वय ४२ वर्षे, व्यवसाय- सुपरवायझर इंडसटॉवर लातुर, धाराशिव रा. खंडाळा ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.१०.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## बनावट RTO वेबसाइट्स व फसवे ॲप्सचा वाढता धोका; नागरिकांनी सतर्क राहावे - परिवहन विभाग

धाराशिव (जिमाका)- परिवहन विभागाच्या निर्दर्शनास आले आहे की,अलीकडील काळात ड्रायव्हिंग लायसन्स,वाहन नोंदणी, ई-चलन इत्यादी सेवांशी संबंधित बनावट वेबसाइट्स,फसवे मोबाईल ॲप्स (APKs), तसेच मोबाइल SMS/WhatsApp द्वारे पाठविल्या जाणाऱ्या खोट्या लिंक्स मोठ्या प्रमाणात नागरिकांना फसवत आहेत.त्यामुळे वाहन चालक आणि मालकांची आर्थिक फसवणूक,वैयक्तिक माहितीची चोरी तसेच ओळखीचा गैरवापर होत असल्याचे आढळून आले आहे.

या पार्श्वभूमीवर सर्व वाहन चालक व वाहन मालक यांनी केवळ परिवहन विभागाच्या अधिकृत शासकीय संकेतस्थळांचाच वापर करावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

अधिकृत संकेतस्थळे खालीलप्रमाणे आहेत.

१. वाहन नोंदणी सेवा (VAHAN) - https://vahan.parivahan.gov.in

२. ड्रायव्हिंग लायसन्स सेवा (SARATHI) - https://sarathi.parivahan.gov.in

३. परिवहन सेवा - https://www.parivahan.gov.in

४. ई-चलन -पोर्टल https://echallan.parivahan.gov.in

ही सर्व संकेतस्थळे .gov.in ने समाप्त होतात..com, .online, site, *.in अशा डोमेनवरील कोणत्याही वेबसाइटवर प्रवेश करू नये,असे स्पष्ट करण्यात आले आहे.

फसवणूक करणाऱ्यांकडून येणारे संदेश बहुधा पुढीलप्रमाणे असतात. आपल्या वाहनाचे चलन बाकी असून त्वरित दंड भरण्याची धमकी देऊन अनधिकृत लिंक पाठविण्यात येते.DL (वाहन चालविण्याचा परवाना) सस्पेंड होणार आहे,त्वरित तपासणी करा.

परिवहन विभाग अथवा ठढज कार्यालयाकडून WhatsApp द्वारे कधीही पेमेंट लिंक पाठविली जात नाही,याची विशेष नोंद घ्यावी. तसेच ठढज Services.apk, rmParivahanšUpdate.apk, eChallanšPay.apk ही अनधिकृत APK फाइल्स डाउनलोड करू नयेत. अशा ॲप्सद्वारे OTP, बँकिंग माहिती आणि मोबाईलमधील संवेदनशील डेटा चोरी होण्याची शक्यता असते.नागरिकांनी कोणताही संशयास्पद संदेश किंवा लिंक प्राप्त झाल्यास त्वरित खालील ठिकाणी तक्रार करावी :

राष्ट्रीय सायबर गुन्हे पोर्टल - https://www.cybercrime.gov.in

सायबर फसवणूक हेल्पलाइन - १९३० किंवा जवळचे जिल्हा सायबर पोलीस स्टेशन येथे तक्रार करावी. असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके यांनी केले आहे.

## जिल्ह्यातील मोहिमेत १३६ कुष्ठरुग्ण आढळले:शोधमोहिमेत १५ लाख जणांची तपासणी

धाराशिव (प्रतिनिधी)- आरोग्य विभागाच्या वतीने १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या १६ दिवसाच्या कालावधीत राबवलेल्या कुष्ठरुग्ण शोध मोहिमेत १३६ नवे कुष्ठरुग्ण आढळून आले आहेत. यातील २४ रुग्ण सांसर्गिक प्रकारातील तर ११२ रुग्ण असांसर्गिक प्रकारातील आहेत. प्रत्येक रुग्णांच्या संपर्कातील ३० व्यक्तींची तपासणी केली जात आहे. आरोग्य विभागाचे २०२७ पर्यंत कुष्ठरोगाचा प्रसार शून्यावर आणण्यावर भर दिला आहे. त्या अनुषंगाने दरवर्षी कुष्ठरोग शोध मोहीमही राबवली जात आहे. यंदा १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर दरम्यान शहरी भागातील झोपडपट्टी परिसर व ग्रामीण भागातील सर्व घरातील नागरिकांची तपासणी करण्यात आली होती. ३ लाख घरातील तब्बल १५ लाख नागरिकांची भेटी घेण्यात आल्या होत्या. या तपासणीत १० हजारांवर संशयित रुग्ण आढळून आले होते. त्याची वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर १३६ कुष्ठरुग्ण असल्याचे समोर आले आहे. यातील केवळ २४ रुग्ण हे सांसर्गिक प्रकारातील तर ११२ रुग्ण हे असांसर्गिक आहेत. या रुग्णांवर आता उपचार सुरु करण्यात आले आहेत. नागरिकांनी अंगावर चट्टे आढळून येताच डॉक्टरांना दाखवून घ्यावे, असे आवाहन कुष्ठरोग विभागाच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे. अंगावर चट्टे, हातापायांना मुंग्या येणे, त्वचेला तेलकटपणा, भुवयाची केस गळणे अशी लक्षणे असलेल्या संशयित म्हणून नोंद आरोग्य विभागाने घेतली होती. चट्ट्यावरील बधिरता, त्वचेवरील जंतूची, मज्जातंतूची तपासणी करुन कुष्ठरुग्ण शोधले. वर्ष रुग्ण संख्या २०२२ २१३ २०२३ २४५ २०२४ ४४ २०२५ १३६ डहरीश ्ळींह षरलशलेज्ञ तपासणीत १० हजार ७५ संशयित आढळून आले आहेत. त्यापैकी ५ ते ७ टक्के संशयितांची तपासणी राहिलेली आहे. ती तपासणी येत्या आठवडाभरात केली जाणार आहे. आठवड्यातील २० तास रुग्णांच्या संपर्कात असलेल्या किमान ३० जणांची तपासणी केली जात आहे. उपचार वेळेवर सुरु केल्यास रुग्ण उपचाराने बरे होत आहेत. सांसर्गिक प्रकारातील रुग्णास १२ महिने तर असांसर्गिक प्रकारातील रुग्णांना ६ महिने औषधोपचार दिले जात आहेत. जिल्ह्यात सांसर्गिक प्रकारातील १२८ तर असांसर्गिक रुग्ण २२२ इतके आहेत. अशी माहिती डॉ. मारुती कोरे, सहायक संचालक, कुष्ठरोग यांनी दिली

## जिल्ह्यातील शाळांची दीड वर्षांपासून दुरुस्तीच नाही

उमरगा (प्रतिनिधी)-धाराशिव जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या अनेक प्राथमिक व माध्यमिक शाळा दुरुस्तीचे अनुदान तसेच शाळा अनुदान मागील अठरा महिन्यांपासून शासनाकडून मिळाले नसल्यामुळे शाळांमध्ये आवश्यक देखभाल दुरुस्तीकामे प्रलंबित आहेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेवर थेट परिणाम होत असल्याची भावना शिक्षक व पालकांतून व्यक्त होत आहेत.

जिल्ह्यातील अनेक शाळांत छतावरील गळती, तुटलेल्या खिडक्या, स्वच्छतागृहांची दुरुस्ती, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विजेची कामे यांसारखी मूलभूत कामे ही केवळ अनुदानाचा अभाव असल्यामुळे रखडली गेले आहेत. अनेक शाळा पालकांकडून किंवा स्थानिक मदतीतून किरकोळ दुरुस्तीची कामे उभी करून सध्या परिस्थिती निभावत आहेत. दरम्यान, शिक्षण विभागाकडून मात्र अनुदान लवकरच वितरीत होईल, असे आश्वासन देण्यात येत असल्याची माहिती मिळते. पण प्रत्यक्षात निधी मिळेपर्यंत शाळांचे दैनंदिन व्यवहार अडचणीतच राहणार आहेत.

शाळांचे अनुदान लवकर मंजूर करण्यात यावे... दर वर्षाला शासनाकडून शाळांना देखभालीसाठी अनुदान देण्याची तरतूद आहे. मात्र सलग १८ महिन्यांपासून अनुदान वितरीत झाले नसल्याने शाळा आर्थिक अडचणीत सापडलेल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या मूलभूत सोयी-सुविधांवर परिणाम होऊ नये म्हणून लवकरात लवकर अनुदान मंजूर करावे, अशी मागणी शिक्षकांनी केली आहे.

## ट्रेसिबिलिटीनेट अंतर्गत निर्यातक्षम फळे व भाजीपाला बागांची ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन

धाराशिव(जिमाका) :जिल्ह्यात विविध योजनांमधून मागील काही वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात आंबा फळबागांची लागवड करण्यात आली आहे.आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी व्यावसायिक दृष्टिकोनातून लागवड करून नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करीत निर्यातक्षम दर्जाचे आंबा उत्पादन घेतले आहे. जागतिक बाजारपेठेतील ग्राहकांसोबतच स्थानिक बाजारपेठेतील ग्राहकांमध्येही आरोग्याच्या सुरक्षिततेबाबत, विशेषतः कीटकनाशक उर्वरित अंशाबाबत जागरूकता निर्माण झाली आहे.

राज्यातील जास्तीत जास्त फळे व भाजीपाला पिकांचे उत्पादन करून ते युरोपियन व इतर देशांना निर्यात केले जाते. युरोपियन देशांनी कीटकनाशक उर्वरित अंश मुक्तीची हमी देण्याची अट घातल्याने सन २००४-०५ पासून राज्यात अपेडाच्या मार्गदर्शनाखाली 'ग्रेपनेट' या ऑनलाईन कार्यप्रणालीद्वारे निर्यातक्षम द्राक्षबागांची ऑनलाईन नोंदणी करण्याची कार्यवाही राबविण्यात येत आहे.सन २०२५-२०२६ या वर्षाकरीता ही नोंदणी प्रक्रिया जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,धाराशिव यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

ग्रेपनेटच्या यशस्वी अंमलबजावणीचा विचार करता आंब्यासाठी 'मँगोनेट', डाळिंबासाठी 'अनारनेट', भाजीपाला पिकांसाठी 'व्हेजनेट', संत्रा,मोसंबी व लिंबूसाठी 'सिट्रसनेट', खाण्याच्या पानासाठी 'बिटलनेट', कांद्यासाठी 'ओनियननेट', तसेच बोर, लिची, पायनॅपल, वॉटरचेस्टनट, वुडपल व केळी या फळपिकांसाठी 'ऑदर फ्रुटनेट' या विविध फळपिकांच्या ऑनलाईन नोंदणीसाठी अपेडाच्या संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.या सुविधांचा वापर करून जास्तीत जास्त फळे व भाजीपाला पिकांची ऑनलाईन निर्यातक्षम बाग म्हणून नोंदणी करता येणार आहे.

कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे आरोग्याच्या सुरक्षिततेबाबत सुरक्षित अन्न पिकवा या उपक्रमाची अंमलबजावणी करण्याबाबत केंद्र शासनाने सूचना दिल्या आहेत.तसेच स्थानिक बाजारपेठेत ग्राहकांना कीटकनाशक उर्वरित अंशाची हमी देण्यासाठी भारतीय अन्न सुरक्षा मानक प्राधिकरणाने अधिकतम उर्वरित अंश मर्यादा (MRL) निश्चित केल्या आहेत.

सन २०२५-२०२६ मध्ये निर्यातक्षम बागांची नोंदणी व बागांची तपासणी करण्याकरीता प्रत्येक तालुक्यातील सर्व कृषि सहायक,कृषि पर्यवेक्षक व कृषि अधिकारी यांची तपासणी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. निर्यातक्षम बागांची नोंदणी करण्याचा कालावधी निश्चित करण्यात आला असून त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**ट्रेसिबिलिटीनेट ऑनलाईन नोंदणीचा कालावधी :**

द्राक्ष - ग्रेपनेट :१ नोव्हेंबर २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५,आंबा - मँगोनेट : १ ऑक्टोबर २०२४ ते १ जानेवारी २०२५,डाळिंब - अनारनेट : वर्षभर सुरू,भाजीपाला - व्हेजनेट : वर्षभर सुरू व लिंबुवर्गीय फळपिके - सिट्रस असा आहे.

## जूनियर वकिलांना स्टायपेंड द्या, खाजगी विधेयक लोकसभेत मांडले- खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर




धाराशिव (प्रतिनिधी)- देशाच्या न्यायव्यवस्थेची ताकद म्हणजे न्यायासाठी लढणारी तरुण वकिलांची पिढी. पण सत्य हे आहे की न्यायालयात सुरुवात करणाऱ्या अनेक ज्युनियर वकील बांधव-भगिनींना पहिली काही वर्षे कोणताही आर्थिक आधार नसतो. त्यामुळे अनेक जण आर्थिक अडचणींमुळे हा व्यवसाय सोडतात आणि सक्षम न्यायव्यवस्थेचे स्वप्न अधुरं राहतं. अधिवक्ता अधिनियम १९६१ या बिलावर दुरुस्तीसाठी खाजगी विधेयक मांडले.

या वास्तवाला बदलण्यासाठी तामिळनाडू राज्याच्या धर्तीवर ज्युनियर वकिलांना स्टायपेंड मिळावे अशी महत्त्वाची आणि ऐतिहासिक मागणी घेऊन खाजगी विधेयक संसदेत मांडण्यात आले.हे फक्त एक विधेयक नव्हतं. हा आवाज होता देशभरातील संघर्ष करणाऱ्या प्रत्येक नवख्या वकिलाचा

विधेयकाचे प्रमुख मुद्दे ज्युनियर वकिलांना मासिक स्टायपेंड मिळावे, यासाठी स्वतंत्र निधी निर्माण करावा, ग्रामीण, महिला आणि वंचित घटकातील वकिलांना प्राधान्य हा निर्णय महत्त्वाचा का?

न्यायव्यवस्थेत नवीन पिढी सक्षम आणि आत्मनिर्भर बनेल कायदा शिकणाऱ्यांचा आत्मविश्वास वाढेल सक्षम, प्रशिक्षित आणि न्यायसंवेदनशील वकील बांधवांना मिळतील असे ते म्हणाले.

## तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात संघरत्न नगदेच्या प्रयोगास द्वितीय क्रमांक



धाराशिव, (प्रतिनिधी)-जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभाग आणि पंचायत समितीच्या गटशिक्षण कार्यालयाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात छत्रपती शिवाजी हायस्कूलच्या संघरत्न सुभाष नगदे याने द्वितीय क्रमांक पटकावला आहे. त्याबद्दल संघरत्न नगदे या विद्यार्थ्याचा प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरव करण्यात आला.

धाराशिव शहरातील यशवंतराव चव्हाण प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे सोमवार, ८ डिसेंबर रोजी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनामध्ये विकसित आणि आत्मनिर्भर भारत या संकल्पनेवर आधारित विज्ञान प्रयोगांचे सादरीकरण करण्यात आले होते. या प्रदर्शनात संघरत्न नगदे याने कचरा व्यवस्थापन या विषयावर सादर केलेल्या प्रयोगास द्वितीय क्रमांक मिळाला आहे. गटविकास अधिकारी एस. एस. नलावडे, गटशिक्षणाधिकारी ए. जी. सय्यद, विस्तार अधिकारी डी. आर. हाके यांच्या हस्ते प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले.

## तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात विद्याभवन हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी पटकाविला प्रथम क्रमांक



कळंब (प्रतिनिधी)-विद्याभवन हायस्कूल, कळंब प्रशालेतील विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात माध्यमिक गटातून सहभाग घेतला होता . त्यांनी स्मार्ट एग्रीकल्चरल रोबोट या विषयावर त्यांनी उत्कृष्ट असे प्रयोगाचे सादरीकरण केले. या प्रयोगाची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे. या मिळवलेल्या यशाबद्दल प्रशालेच्या वतीने विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रशालेचे मुख्याध्यापक कुंभार व्ही जी उपमुख्याध्यापक मयाचारी व्ही एस, पर्यवेक्षक कोळी जे एन यांच्या हस्ते अरहत वाघमारे, अनुज टिप्परसे, धीरज शेंडगे, वेदांत जोशी या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक काझी सर ,विनोद सागर, श्रीमती बचाटे आर आर , डी बी पवार, सुरेश चव्हाण यांचा प्रशालेच्यावतीने सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष अनिल मोहेकर , संस्थेचे सचिव डॉ अशोकराव मोहेकर यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवार एस जे यांनी केले.

## मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी १,७२,८५० 'तडजोड शुल्क'

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.१० डिसेंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २१३ कारवाया करुन १,७२,८५० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## Change of Name Declaration

Here in this advertise I am declaring that I have change My Name which was: **KAZI MOHAMMAD BURHANUDDIN**
TO: **KAZI BURHANODDIN NASIRUDDIN**
Hence for this Declaration i will be known by this name and will use. In future the **KAZI BURHANODDIN NASIRUDDIN** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME: - : **KAZI MOHAMMAD BURHANUDDIN**
NEW NAME: - **KAZI BURHANODDIN NASIRUDDIN**
Address:-LOHAR GALLI, OSNANABAD.TAL& DIST. OSMANABAD -413501
AADHAR NO: - 710311552885 Mobile. No.-8888209088

---

## Change of Name Declaration

Here in this advertise I am declaring that I have change My Name which was: **KAZI TABASUM MOHAMMAD BURHANUDDIN**
TO : **TABASUM BURHANODDIN KAZI**
Hence for this Declaration i will be known by this name and will use. In future the **TABASUM BURHANODDIN KAZI** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME: - : **KAZI TABASUM MOHAMMAD BURHANUDDIN**
NEW NAME: - **TABASUM BURHANODDIN KAZI**
Address:-16/47, LOHAR GALLI, OSNANABAD. TAL& DIST. OSMANABAD -413501
AADHAR NO: - 954957075388 Mobile. No.-7972384268

---

## Change of Name Declaration

Here in this advertise I am declaring that I have change My Name which was: **KAZI MUBASHIRODDIN NASIRODDIN**
TO : **KAZI MUBASHIRODDIN BURHANODDIN**
Hence for this Declaration i will be known by this name and will use. In future the TABASUM BURHANODDIN KAZI will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME: - : **KAZI MUBASHIRODDIN NASIRODDIN**
NEW NAME: - **KAZI MUBASHIRODDIN BURHANODDIN**
Address:-16/47, LOHAR GALLI, OSNANABAD. TAL& DIST. OSMANABAD -413501
AADHAR NO: - 937364907478 Mobile. No.-9112346600

---

## Change of Name Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **NAWAB FAROOQ PASHA**
TO: **SHAIKH FARUQ A. KARIM**
Hence for this Declaration i will be known by this name and will use SHAIKH FARUQ A. KARIM in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **NAWAB FAROOQ PASHA**
NEW NAME :- **SHAIKH FARUQ .A. KARIM**
Address - Naldurg Taluka Tuljapur Dist Osmanabad. -413602
Adhar n.-938038149760 Mob.9545508314


# के. टी. पाटील कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थिनीला आंतरराष्ट्रीय परिषदेतील ओरल पोस्टर प्रेझेंटेशनमध्ये तृतीय क्रमांक




धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ के . टी . पाटील कॉलेज ऑफ फार्मसी धाराशिव मध्ये फार्म डी च्या दुत्तीय वर्षांत शिकत असलेली साक्षी सुभाष लोखंडेने केएलइ कॉलेज ऑफ फार्मसी , हुबळी (कर्नाटक) येथे आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत मौखिक पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे . या परीषदेत एकूण १० विविध विषयावर स्पर्धा ठेवली होती त्यात साक्षी लोखंडेने आर्टीफिसिअल इंटेलेगिन्स आधारित माय फार्मा बँक या विषयावर आपले सादरीकरण करून परीक्षकांचे मने जिंकली.

या परिषदेत देश-विदेशातील एकूण ५८ विविध नामांकित संस्था, महाविद्यालय व संशोधकांनी सहभाग नोंदवला होता. कठोर स्पर्धेत साक्षी सुभाष लोखंडेचे सादरीकरण नवीनता, संशोधनातील गुणवत्ता आणि प्रभावी मांडणी यांसाठी विशेष ठरले व तिला के . टी . पाटील कॉलेज ऑफ फार्मसी मधिल डॉ. शिवशंकर गुंजेगावकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले

या यशाबद्दल व्यवस्थापन, प्राचार्य, व सर्व शिक्षकवर्गाने विद्यार्थ्याचे मनःपूर्वक अभिनंदन करून उज्ज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या आहेत.





**जिल्हादंडाधिकारी कार्यालय, धाराशिव** (उपचिटणीस शाखा)
मेन रोड, धाराशिव पिनकोड - ४१३५०१ दुरध्वनी क्र. ०२४७२-२२७३०१
Email Id-rdc1osmanabad@gmail.com

जा.क्र २०२५/उपचिटणीस/एमएजी-५/कावि-५७८/ सिआर-१३ दिनांक :-०८/१२/२०२५

## जाहिर प्रगटन
## ( विस्फोटक नियम २००८ चे नियम १०७)

सर्व नागरिक मौजे मांडवा ता.वाशी जि. धाराशिव यांना या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, मौजे, मांडवा ता. वाशी जि. धाराशिव येथील जमीन गट नंबर ५०६ मध्ये **श्री. जहांगीर हुसेल कोरबू ता. वाशी** यांनी शोभेची दारू कब्जात ठेवून विक्री (फटाका विक्री) करणेची अनुज्ञाप्ती फॉर्म नंबर २४ विस्फोटक नियम २००८ अन्वये अनुज्ञाप्ती एल ई-५ मिळणेसाठी अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे. प्रस्तावित जागेची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

**१. पूर्व बाजू - बिभीषण विठ्ठलराव रणदिवे**
**२. पश्चिम बाजू - संभाजी शिरोजी सिरसट**
**३. दक्षिण बाजू - विनीत बिभीषण रणदिवे**
**४. उत्तर बाजू - जिल्हा परिषद रोड मांडवा-घोडकी**

सदर परवानगीबाबत स्थानिक चौकशीबाबत मा.पोलीस अधीक्षक, धाराशिव/कार्यकारी अभियंता म.रा.वि.वितरण कंपनी, धाराशिव/कार्यकारी दंडाधिकारी, वाशी/कार्यकारी अभियंता, (बांधकाम) जि.प.धाराशिव, यांचेमार्फत झालेली आहे.

तरी, **श्री. जहांगीर हुसेल कोरबू ता. वाशी** यांना मौजे. मांडवा ता. वाशी येथे अनुज्ञाप्ती फॉर्म नंबर २४ विस्फोटक नियम २००८ अन्वये अनुज्ञाप्ती एल ई-५ ची परवानगी देणेबाबत कोणास कांही आक्षेप असल्यास, सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाले पासून (०८) दिवसाचे आत समक्ष हजर राहून या कार्यालयास लेखी सादर करावेत. विहित मुदतीत आक्षेप प्राप्त न झालेस पुढील नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**(विद्याचरण कडवकर)**
**अपर जिल्हादंडाधिकारी धाराशिव**

**जिमाका/एके/जाहि/१००**


# गटारी तुंबल्याने रस्त्यात सांडपाणी; डासांचा प्रादुर्भाव, आजारांचा धोका



उमरगा (प्रतिनिधी)- मागील काही दिवसांपासून वातावरण बदलाने नागरिक हैराण झाले आहेत. राष्ट्रीय महामार्ग व शहरातील अंतर्गत भागातील गटारी तुंबल्याने डुक्करे अन् डासांची मोठ्या प्रमाणात उत्पत्ती झाली असल्याने साथीच्या आजारांचा धोका वाढला आहे. या दुरवस्थेकडे मात्र पालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.

राष्ट्रीय महामार्गालगत उत्तर बाजूला मुख्य गटार नसल्याने राष्ट्रीय महामार्गावरूनच घाण पाणी वाहतेय. अंतर्गत भागातील गटारीचे घाण पाणी तुंबल्याने रस्त्यालगतच्या खुल्या भूखंडात दुर्गंधीयुक्त पाणी साचत असल्यामुळे डेंग्यू व चिकनगुणियासदृश साथ आजाराची भीती निर्माण झाली आहे. काही दिवसांपासून वातावरणात थंड गारवा, ढगाळ-दमट हवामान निर्माण झाल्याने त्यात हिवाळा सुरू झाल्याने शहर व परिसरातील अनेक भागात समस्या निर्माण झाल्या आहेत. स्वच्छ शहर, सुंदर शहर संकल्पना ही फक्त कागदावर असल्याचे दिसून येत आहे. दमट हवामानामुळे माशा, गटारीच्या दुर्गंधीयुक्त पाण्याने डासांचे प्रमाणात लक्षणीय वाढ झाली आहे. माशा व डासांमुळे संसर्गजन्य आजार वाढत असून, अशुद्ध पाण्यामुळे गॅस्ट्रो, विषमज्वर, टायफाइड, कावीळ, उलट्या, थंडी ताप आदींसह आजार बळावण्याची शक्यता आहे. पालिका प्रशासनाने केवळ दिखावाच करण्यात संबंधित ठेकेदार व कर्मचारी केवळ कचरा संकलन करण्यात धन्यता मानत आहेत. वर्षभरात नाही किमान हिवाळ्यात तरी नगर पालिकेने कीटकनाशकांची फवारणी करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. अंतर्गत गटारीचे पाणी मुख्य राष्ट्रीय महामार्गावर मुगळे हॉस्पिटलपासून ते शिवाजी महाविद्यालयासमोर जवळपास अर्धा ते एक किलोमीटर अंतरावरती साचले असून काझी कॉम्पलेक्स ते विश्व लॉजपर्यंत रस्त्यालगत पाणी वाहत असतानाही याकडे लक्ष देत नसल्याने नागरिकांनी स्वत-:च डेंग्यू व साथ आजारापासून बचाव करण्यासाठी सुरुवात केली आहे. घरातील अन्न पदार्थ, पालेभाज्या झाकून ठेवून वैयक्तिक स्वच्छता राखत आहेत.

**टायफॉइड, गॅस्ट्रो रुग्ण वाढण्याची शक्यता...**

हिवाळ्यातील दमट हवामानामुळे घरोघरी माशा गटारीच्या दुर्गंधीयुक्त पाण्याने डासांचे प्रमाणात लक्षणीय वाढ झाली आहे. माशा व डासांमुळे संसर्गजन्य आजार वाढत असून अशुद्ध पाण्या-मुळे विषमज्वर, टायफाइड, गॅस्ट्रो, कावीळ यासह आजार बळावण्याची शक्यता आहे. नगरपालिका प्रशासनाने वर्षभरात नाही तर किमान हिवाळ्यात तरी कीटकनाशकांची फवारणी करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# कळंब-भोगजी, गोविंदपूर-खामसवाडी रस्त्यांवर मोठे खड्डे; अपघातांमध्ये वाढ

कळंब (प्रतिनिधी)- कळंब-भोगजी तसेच गोविंदपूर- खामसवाडी-मोहा या मार्गावरती खड्डे मोठ्या प्रमाणात पडल्यामुळे वारंवार अपघात होत आहेत. सध्या ऊस गाळप हंगामामुळे ऊस वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरू असल्याने परिस्थिती सुरू असल्याने परिस्थिती आणखी गंभीर बनली आहे. शिवाय रस्त्यावर मोठ्या प्रमाणात दोन ते तीन फूट खोल खड्डे पडल्याने अपघातांचे प्रमाण वाढले असून शेतकरी, नागरिक व विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे बांधकाम विभागाने याकडे लक्ष द्यावे अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

जिल्ह्याला जोडणारा मुख्य रस्ता तालुक्यातील कळंब-भोगजी रस्ता आहे. या रस्त्याची अवस्था ग्रामीण मार्गापेक्षा देखील गैरसोईची झालेली आहे, सदरील रस्त्यावर अंदाजे दोन ते तीन फुटाचे खड्डे पडलेले आहेत. तसेच सदर रस्त्यावरील डांबर पुर्णत: उखडून गेले आहे. या रस्त्याने भोगजी, आडसुळवाडी, आढाळा, आथर्डी, पाथर्डी, खोदला, भांटसांगवी, सात्रा व इतर गावे जोडलेली आहेत, या गावच्या ग्रामस्थांना तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठी एकच मुख्य मार्ग आहे. या अशा दुरावस्थेतील रस्त्यामुळे त्यांची गैरसोय होत असल्याने शेतकरी, नागरिक, विद्यार्थी यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. शिवाय सदरील रस्ता नादुरुस्त असल्याने अपघाताचे प्रमाण खुप वाढले आहे. सध्या ऊस गाळपाचा हंगाम सुरु असल्याने शेतातील ऊस वाहतुक करुन कारखान्याकडे गाळपासाठी मोठ्याप्रमाणात वाहतुक होत आहे. रस्ता तात्काळ दुरुस्त करावा अन्यथा १ जानेवारी रोजी गावकरी, शेतकरी व विद्यार्थ्यांसह युवा सेनेच्या (उबाठा गट) वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे तहसीलदार यांना देण्यात आला आहे. या निवेदनावर युवा सेना तालुका प्रमुख पंडित देशमुख, गुणवंत झटाळ, शैलेश थोरबोले, नितीन चौधरी, बापूसाहेब पिंगळे, हर्षवर्धन पाटील यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

लोकप्रतिनिधी लक्ष देतात का? : कळंब - मोहा - येडशी रस्त्याचे ७ कोटीच्या आसपास टेंडर झाले आहे. यातील कळंब - तांदूळवाडी मधील काम अद्यापही करण्यात आलेले नाही. दररोज या मार्गावरून प्रवास करणाऱ्या हजारो नागरिकांसाठी अत्यंत त्रासदायक व धोकादायक ठरत आहे. रस्त्याची कामे अर्धवट अवस्थेत राहिल्यामुळे दररोजचा प्रवास अक्षरश कठीण झालेला आहे. रस्ता अर्धवट खोदलेला असल्यामुळे मोठ्या प्रमाणात दगड रस्त्यावर पडलेले आहेत. यात विशेष म्हणजे या रस्त्यावरुन जाणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्वाधिक त्रास होत आहे. या संदर्भात नागरिक प्रणव नरहिरे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर व आमदार कैलास घाडगे पाटील यांनी याकडे लक्ष द्यावे कशी मागणी केली आहे. यावर लोकप्रतिनिधी लक्ष देतात का? याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

उपमार्गांवरील ऊस वाहतूक वाढली, खड्ड्यांमुळे अपघातांचा धोका अधिकच खामसवाडी -मोहा परिसरात गूळ पावडर निर्मितीचे कारखाने असून, या कारखान्यांकडे मोठ्या प्रमाणात ऊस वाहतूक चालू आहे. तसेच मोहा-खामसवाडी मार्गावरून ढोकी येथील तेरणा साखर कारखाना, रांजणी येथील नॅचरल कारखाना, तडवळा येथील एसपी शुगर आदी कारखान्यांकडे ऊस वाहतूक सुरू आहे. गोविंदपूर-खामसवाडी रस्त्याचे काही वर्षांपूर्वी डांबरीकरण झाले असले तरी साइड पट्टी अरुंद असल्याने आणि रस्त्याच्या कडेला वाढलेल्या झाडे-झुडपांमुळे वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. खड्ड्यांमुळे या मार्गावर वारंवार अपघात होत असल्याने बांधकाम विभागाने तातडीने लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, तलवारीने मारहाण

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, नारायण निवृत्ती काळे, शंभु नारायण काळे, सुष्मा नारायण काळे सर्व रा. अपसिंगा ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.०४.१२.२०२५ रोजी ०७.४५ वा. सु. कात्री अपसिंगा रोडवर फिर्यादी -हनुमंत नामदेव डुकरे, वय ४२ वर्षे, रा. अपसिंगा ता. तुळजापूर जि. धाराशिव यांना नमुदांनी बांधावरील पोल काढून तो आमच्या शेतात का रोवला या कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, तलवारीने मारहाण करुन गंभीर जखमी केले. फिर्यादी यांचे भाउ प्रकाश नामदेव डुकरे यांनाही डाव्या हातावर मारुन जखमी केले. फिर्यादीचे आईस ढकलून दिले. जिवे ठार मारण्याची धमकी दिली. मजकुराच्या फिर्यादी नामे-हनुमंत डुकरे यांनी दि.१०.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे तुळजापूर येथे भा.न्या.सं.कलम ११८(२),११८(१), ११५(२), ३५२,३५१(२), (३),३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.


**लातूर समाचार धाराशिव**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ॥

# लातूर समाचार

## वन्य प्राण्याचा वावर शहराकडे वळला

राज्यात वन्य प्राण्याचा वावर शहरराकडे वळत असल्याने भीतीचे वातावरण दिसून येत आहे. राज्याच्या हिवाळी अधिवेशनात या बाबत लोकप्रतिनिधीनी आवाज उठविला आहे. त्याच प्रमाणे आलिकडे वाघाचा शिरकाव लोकवस्तीत होत आहे. मानवा बरोबर जनावरावर हल्ले होत आहेत. अशा घटनेत वाढ होत आहे. त्यामुळे चिंता व्यक्त करून यावर उपायोजना करण्यासाठी लोकप्रतिनिधीनी मागणी केली आहे. मुळात जंगली प्राणी शहरी वस्तीकडे का वळत आहेत यावर चिंतन झाले पाहिजे. पुर्वी पेक्षा मानवीवस्तीत जंगली प्राण्याचा वावर वाढला आहे यामागील कारणाचा शोध घेतला पाहिजे. मुळात सर्वात महत्त्वाचे म्हणजे काँक्रेटची जंगलात वाढ होत आहे. जंगले नष्ट होत आहेत. अशा स्थितीत जंगलात शेळया-बकरे सोडणे योग्य वाटते का? हा उपाय आहे का? मुळात जंगली प्राणी आहेत त्यांचे निवास व जीवनमान म्हणजे सर्वस्व हे जंगल आहे. त्यामुळे मानवाने पहिल्यांदा जंगलाचा विकास केला पाहिजे. जंगले नष्ट होत आहेत. या मागील कारणांचा शोध घेतला पाहिजे. जंगले का समाप्त होत आहेत. यावर अतिक्रमण करणारे कोण आहेत. याचा विचार झाला पाहिजे. जंगले समाप्त होण्याच्या मार्गावर आहेत. त्याच बरोबर जंगली प्राण्याच्या प्रजाती नष्ट होताना दिसून येत आहेत. जंगलात अनेक प्राणी राहातात. त्यांची व्यवस्था ईश्वराने केली आहे. त्यांचा आहार हा जंगलात उपलब्ध केलेला आहे. जंगलात अनेक प्राणी राहाता. हात्ती, हरिण, राण-मांजर, डुकरे, माकड किती तरी प्राणी आहेत. त्यांचे निवास व जीवनमान मानव बळकावत आहे. जंगली नष्ट होत असतील तर हे जंगली प्राणी जाणार कोठे? ते मानव वस्तीत वळत आहे. त्यांना खाण्याची व पाण्याची व्यवस्था होत नसल्याने शहरी व गाव भागाकडे वळत आहेत. त्यामुळे ते समोरच्यावर हल्ले करीत आहेत. हरिणास सुद्धा खायला काही मिळत नसल्याने ते शेतात येऊन पीके नष्ट करीत आहेत. जंगल संपत्ती ही जपली पाहिजे. तीएक देशाची शान आहे. जंगल पुर्वी अफाट होते. कालांतराने ती नष्ट करीत मानवाने जंगलावरच आक्रमण केले आहे. जंगलातील सर्व प्राणी हिंस्त्र नाहीत. त्यामुळे भीतीचे कारण नाही. शहरात माकडे सतत येतात. का येतात तर त्याना खायला व प्यायला नसल्याने त्याच्या शोधात मानवी वस्तीत येत आहेत हे कारण शोधले पाहिजे. त्याच प्रमाणे बिबट्याचा वावर वस्ती भागात वाढला आहे. त्यामुळे जनता भयभीत होत आहे. तो जनावरावर व कुत्र्यावर हल्ले करीत आहे. राणात काम करणाऱ्या शेतकऱ्यावर हल्ला करीत आहेत. ही वस्तूस्थिती आहे. यावर उपाया शोधणे म्हणजे पुर्वी सारखी जंगले असणे आवश्यक आहे. दाट जंगले असली पाहिजेत. वरचेवर झाडे तोडे मोठ्या प्रमाणात होत आहेत. प्राण्यास राहाण्यासाठी निवारा नाही व पोटाला खायला मिळत नसेल तर जंगली प्राणी मानव वस्त्याकडे वळल्याशिवाय राहाणार नाहीत. त्याच प्रमाणे सध्याला पिण्याची सोय आवश्यक आहे. उन्हाळ्यात तर प्राण्याचे मोठे हाल होतात. त्यासाठी सुद्धा सोय केली पाहिजे. सध्याला वाढते बिबट्याचे हल्ले पाहाता मध्यस्थ असा मार्ग शोधला पाहिजे. काही झाले तरी राज्यात बिबट्या गाव भागात शिरत आहेत. हल्ला करीत आहेत. त्यातच बिबट्याला मारणे अशी सुचना समोर येत आहे ती चुकीचे आहे. मुळात सर्वप्रथम जंगले जोपासले पाहिजेत. जंगले वाढली पाहिजेत तरच जंगल संपत्ती लाभणार आहे. गाव वस्ती जंगलाच्या जवळ असेल तर जंगली प्राण्यास अन्न शोधासाठी गाव वस्तीत मोर्चा वळलेला दिसून येत आहे. जंगले वाढली तर जंगली प्राण्यात वाढ होऊ शकेल. मुळात जंगली संपत्ती म्हणजे जंगली मेवा उपलब्ध होतो. तो मानवासाठी उत्तम असतो. जंगलात अनेक फळाचे झाडे असतात. जसे पेरू, चिक्कू, सीताफळ, बिब्याचे फुले असे विविध जंगली मेवा हा आरोग्यासाठी लाभकारक असतो. अनेक औषधी वनस्पती आपोआत उगवली जाते. अर्जुन झाडे, त्याच्यासाल आरोग्यासाठी उत्तम आहे. जंगलात अनेक औषधी वनस्पती सापडतात. जंगली संपत्ती अनमोल आहे. वैद्य मंडळी जंगलातून अनमोल वनस्पती शोधून प्रभावी जडीबुट्टी देतात. त्यांना जंगली झाडपाल्याची माहिती असते. निसर्ग नियमानुसार जंगलातील प्राणी आवश्यक आहेत, तसेच जंगली वनस्पती ही लाख मोलाचे आहेत हे विसरता येत नाहीत. त्यामुळे जंगल जोपासणे ही काळाची गरज आहे. केवळ बिबट्या शहरी भागात येत आहे म्हणून विचार करणे योग्य नाही. बिबट्या गाव भागात कोणत्या कारणाने येत आहे याबाबत विचार झाला पाहिजे. आलिकडे अशा घटनेत वाढ होत आहे. विधानसभेत या बाबत चर्चा होत आहे. त्यामुळे सर्व बाबीचा विचार केला पाहिजे. जंगल संपत्ती कोणत्याही परिस्थितीत नष्ट होता कामा नये. जंगली संपत्ती वाढली तरच जंगली प्राण्यास खाण्यासाठी उपलब्धता होईल. आज खायला-प्यायला नाही. जंगलाची व्याप्ती कमी होत असल्याने ते वस्ती भागात येत आहेत. हल्ले करीत आहेत. त्यामुळे वेळीच उपायोजना केली पाहिजे. जंगल वाढले तरच आपोआप प्रश्नाची सोडवणुक होणार आहे. जंगली नष्ट होत असल्याने हिंस्त्र प्राण्याचा धोका वाढला हे कारण समजुने घेतले पाहिजे. जंगलात शेळया-बोकड सोडणे हा कायम स्वरूपी उपायोजना नाही ही बाब लक्षात घेतली पाहिजे. अनेकजन जंगल मालमत्ता हडप करण्याचा विचार करीत आहेत. याचा परिणाम जंगले नष्ट होत आहेत. अनेक कारणाने जंगल समाप्त होण्याच्या मार्गावर आहे ही बाब घातक आहे. जंगल हे अनेक प्राणी जोपासतात. सरकार अनेक जंगले जोपसते. संरक्षण करते. असेच लक्ष देण्याची गरज आहे. जंगल नष्ट करणे म्हणजे आपण आपल्या पायावर दगड मारून घेण्यासारखे आहे. त्यामुळे जंगली प्राणी जोपासणा करणे कर्तव्य आहे. हानी नाही. त्यामुळे जंगले वाढली पाहिजे. यासाठी सरकारने आर्थिक तरतुद केली पाहिजे. शहरी भागाकडे बिबटया येत आहेत त्यामुळे मुळ कारणाचा शोध घेऊन उपयोजना करणे आवश्यक आहे.

## आदर्श प्रशासक - प्राचार्य डॉ. एल.जी. जाधव



प्रा.डॉ. मारुती अभिमान लोंढे
(अर्थशास्त्र विभाग प्रमुख,रामकृष्ण परमहंस महाविद्यालय,धाराशिव)

आवाजाने माणसाची नम्रता कळते, वर्तनाने माणसाचे शील समजते, कामाने माणसाची कार्यक्षमता समजते, माणसाची वाणी शुद्ध आणि सात्विक असावी, त्यामुळे समोरच्या व्यक्तीमध्ये आदर वाढतो. अशा प्रकारचा विचार सहवासात आलेल्या सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांना आणि विद्यार्थ्यांना देणारे आर्ट्स अँन्ड कॉमर्स कॉलेज , कडेपूरचे सन्माननीय प्राचार्य डॉ. एल.जी. जाधव साहेब , प्रशासन कामात तल्लीन होऊन हसतमुख असणारे आनंदयात्री यांना विविध संघटनाकडून आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

खरंतर चांगल्या संबंधासाठी सहवास खूप काही वर्षाचा असावा असे काही नसते. पण आहे तो सहवास खूपच दृढ आणि सकस वैचारिक देवाण-घेवाण करणारा असला की, नाते घट्ट होते.

साहेबांची संभाषण करण्याची कला खूपच छान आहे. ते जेव्हा समोरच्या व्यक्तीसोबत संभाषण करतात, तेव्हा काही क्षणांमध्ये त्या व्यक्तीला ते आपलेसे करतात, ही दैवी शक्ती ईश्वराने कदाचित त्यांना दिलेली आहे. काम करणाऱ्या गुरुदेव कार्यकर्त्यांना सर्वांच्या समोर शब्बासकीची थाप देणारे एकमेव रत्नपारखी प्राचार्य डॉ.एल.जी.जाधव हे आहेत.

भाषण करताना आणि गुरुदेव कार्यकर्त्यांना बैठकीत मार्गदर्शन करताना काना मनाला वेड लावणारी त्यांची भाषा विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना आपलीशी वाटते. त्यांनी त्यांच्या जीवनामध्ये विद्यार्थी, काम आणि महाविद्यालयाचा विकास याला खूपच महत्त्व दिले.

ब्रह्माची ओळख झाली की,अज्ञानाची निवृत्ती होते आणि अज्ञानाची निवृत्ती झाली की,त्याच क्षणी परमानंदाची प्राप्ती होते. विद्यार्थ्यांच्यामध्ये परमानंदाची प्राप्ती व्हावी, यासाठी त्यांनी महाविद्यालयातील आणि महाविद्यालयाच्या बाहेर पोलीस भरती करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मैदानी चाचणी परीक्षांची स्पर्धा आणि बौद्धिक लेखी परीक्षांची स्पर्धा घेतलेली आहे आणि घेत आहेत.

अध्यात्माचे केंद्र मनाला संकटावर मात करायला शिकवते. श्रद्धेने पिंपळाच्या पानावर जग तारण्याची ताकद निर्माण होते. विद्यार्थ्यांची स्वतःच्या कष्टावर श्रद्धा असावी यासाठी ते नेहमी अशा स्वरूपाच्या स्पर्धेचा प्रयोग करताना दिसतात.

चंद्रभागेच्या वाळवंटात भगव्या झेंड्याखाली अध्यात्माची लोकशाही समजावून सांगणाऱ्या संतमंडळी प्रमाणे आपण सहवासात असणाऱ्या प्रामाणिक लोकांच्या जीवनाचे सोने केले आहे. वेणूताई चव्हाण महाविद्यालयात प्राचार्य म्हणून काम करत असताना अनेक प्राध्यापकांसाठी आपण परिसाचे काम केले आहे.आता त्यांच्या जीवनाचे सोने झाल्याचे दिसते. प्रामाणिक आणि कष्ट करणाऱ्या लोकांच्या चुली पेटवण्याचे महत्वपूर्ण कार्य आपल्या हातातून घडले आहे.

विद्यार्थ्यांना ज्ञानरूपी अमृत देताना गाडीतून मैदानात येऊन हातात बॅट घेऊन सचिन तेंडुलकरची नक्कल करणारा श्रीमंत घरातला पोरगा आणि आपल्या आईचा दाळ भाकरीचा बसमधून येणारा डबा घेणारा पोरगा, मोलकर्णीचा पोरगा, सफाई कामगाराचा पोरगा, शेतमजुराचा पोरगा यामध्ये त्यांनी कधीच भेदभाव केला नाही. मालदांडी ज्वारीच्या भाकरीवर पोसलेलं पोरग कोकणातल्या भाताला ज्ञानाच्या क्षेत्रात मागे टाकेल अशी ताकद त्याच्या मेंदूमध्ये आपण आपल्या प्रदीर्घ सेवेमध्ये निर्माण केली. शिक्षण हा अलंकार आहे.शिक्षणाने माणूस मोठा होतो,शिक्षणाने व्यक्तिमत्व घडते, शिक्षणानेच दोन मुलांचा बाप होण्या अगोदर ४० मुलांचा प्राध्यापक होऊ शकतो, हे आपण आयुष्यभर विद्यार्थ्यांच्या मनामध्ये विचारांची पेरणी केली. आणि म्हणुन आपणाला विविध ठिकाणी पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते आहे.

समोरच्या व्यक्तीला ओळखण्याची ताकद आपल्यामध्ये आहे. खरंतर आपण रत्नपारखीच आहात. काही क्षणामध्ये समोरच्या व्यक्तीला आपण ओळखू शकता ही दैवी शक्ती आपणाला ईश्वराने दिलेली आहे. आणि म्हणून प्रामाणिकपणे काम करणाऱ्या गुरुदेव कार्यकर्त्यांच्या पाठीवर आपली कौतुकाची थाप नेहमी पडते.

चांगल्याला चांगले, वाईटाला देखील चांगले करुन, सकारात्मक दृष्टिकोन ठेवणारे व बुद्धी वैभवाने तेजाळलेल्या या व्यक्तिमत्वाला विविध संस्था आणि संघटनांकडून पुरस्कार देऊन सन्मानित केले जात आहे.त्याबद्दल आपले मनापासून हार्दिक हार्दिक अभिनंदन

## मध्य रेल्वेद्वारे आयोजित ''दिव्यांगजनों के लिए खास दिवस'' निमित्त दिव्यांग रेल्वे कर्मचाऱ्यांचा महाव्यवस्थापकांनी गौरव केला

**मुंबई/प्रतिनिधी** : महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे यांनी दिव्यांगजन कर्मचारी तसेच कर्मचाऱ्यांच्या दिव्यांगजन वॉर्ड (अपत्य) यांना विशेष दिव्यांग-अनुकूल उपकरणे प्रदान केली.

श्री विवेक कुमार गुप्ता, महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे यांनी १०.१२.२०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस सभागृहात मध्य रेल्वेच्या सेंट्रल स्टाफ बेनिफिट फंड अंतर्गत, मध्य रेल्वेच्या कार्मिक विभागाकडून आयोजित ''दिव्यांगजन विशेष दिन'' कार्यक्रमात आदर्श भूमिका पुरस्कार देऊन दिव्यांग रेल्वे कर्मचाऱ्यांचा गौरव केला.

या पुरस्कारामध्ये स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्राचा समावेश असून, स्वतःच्या दिव्यांगत्वावर मात करून उत्कृष्ट सेवा बजावणाऱ्या आणि इतरांसाठी आदर्श निर्माण करणाऱ्या १६ दिव्यांग कर्मचाऱ्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाव्यवस्थापकांनी मुंबई विभागातील ९ दिव्यांग कर्मचाऱ्यांचा सत्कार केला, तर इतर विभागांतील ७ दिव्यांग कर्मचाऱ्यांचा सत्कार महाव्यवस्थापकांच्या वतीने त्या-त्या विभागांचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक करतील. यामुळे दिव्यांग कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांना मुंबईपर्यंत प्रवास करण्याचा त्रास वाचेल.

श्री गुप्ता, महाव्यवस्थापक व कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे यांनी ३ दिव्यांग रेल्वे कर्मचाऱ्यांना दिव्यांगअनुकूल उपकरणे देखील प्रदान केली. यात २ कर्मचाऱ्यांना विशेष वापरास सोयीस्कर सॉफ्टवेअर असलेले लॅपटॉप आणि १ कर्मचाऱ्याला प्रकाशासह मोठी भिंगाचीकाच देण्यात आली. महाव्यवस्थापकांनी रेल्वे कर्मचाऱ्यांच्या दिव्यांगजन वॉर्डला क्रॅचेसची जोडी देखील भेट दिली.

महाव्यवस्थापकांनी या प्रसंगी प्रेरणादायी आणि उत्साहवर्धक भाषण केले. गौतम बुद्ध आणि स्टीफन कोवे यांचे उदाहरण देत त्यांनी सांगितले की, स्वत:वर विजय मिळवणे हाच सर्वात मोठा विजय आहे. दिव्यांग बांधवांनी हा विजय आधीच संपादन केला आहे, कारण अनेक अडचणींवर मात करून ते आज इतरांप्रमाणेच समान स्तरावर उभे आहेत. ते पुढे म्हणाले की, मध्य रेल्वे नेहमीच दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या पाठीशी उभी राहील. त्यांचे कौशल्य वाढवण्यासाठी आणि त्यांचे दैनंदिन जीवन सुलभ




करण्यासाठी आवश्यक सर्व साधने उपलब्ध करून देऊन, तसेच कार्यस्थळी विशेष सुविधा देऊन त्यांना सक्षम बनवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.

कार्यक्रमाचा शुभारंभ पारंपरिक पद्धतीने दिवा प्रज्वलित करून झाले. श्री पी. पी. पांडे, प्रधान मुख्य कार्मिक अधिकारी आणि सीएसबीएफ चे अध्यक्ष यांनी मान्यवरांचे झाडांची रोपटे देऊन स्वागत केले तसेच स्वागत भाषण सादर केले. मध्य रेल्वे सांस्कृतिक अकादमीच्या कलाकारांनी उत्कृष्ट सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमात दिव्यांग कलाकारांच्या कला-सादरीकरणाचाही समावेश होता.

कार्यक्रमाची सांगता वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या प्रोत्साहनपर शब्दांने झाली आणि मुख्यालयात, पाचही विभाग, निर्माण संघटना आणि कार्यशाळांमध्ये कार्यरत असलेल्या १२४० दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी मध्य रेल्वे आपली उपक्रमशीलता पुढेही कायम ठेवणार असल्याचे नव्याने आश्वासन देण्यात आले.

या कार्यक्रमाला श्री प्रतीक गोस्वामी, अतिरिक्त महाव्यवस्थापक; इतर प्रधान विभागप्रमुख; श्री हिरेश मीना, विभागीय रेल्वे व्यवस्थापक, मुंबई विभाग; तसेच मध्य रेल्वेचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.

शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

## शरीरात होणाऱ्या या बदलांकडे अजिबात दुर्लक्ष करु नका, ही एड्सची सुरुवातीची लक्षणे असू शकतात, वेळीच लक्ष द्या

एड्स हा एक जीवघेणा आजार आहे, हा आजार एचआयव्ही विषाणूमुळे होतो. लोकांमध्ये एड्सची माहिती कमी आणि भीतीचे वातावरण जास्त आहे. तर या जीवघेण्या आजाराची माहिती असणे अत्यंत गरजेचे आहे. त्याच्या लक्षणांबद्दल अचूक माहिती असणे विशेषत: महत्वाचे आहे, जेणेकरून सुरुवातीच्या टप्प्यात ती ओळखता येतील. तसं पाहायला गेलं तर एड्स हा असा आजार आहे, ज्याची वेळीच ओळख झाली तर राहणीमानात योग्य बदल करून रुग्णाचे आयुर्मान वाढवता येते. पण अनेकांना एड्सची लक्षणंच माहीत नसतात. ज्यामुळे आपण ती वेळेत ओळखू शकत नाही आणि बऱ्याचदा ते शोधण्यात बराच वेळ लागतो.

**एड्स रुग्ण दीर्घ निरोगी आयुष्य जगू शकते, पण..**

एड्स हा एक घातक रोग असला तरी एड्स ग्रस्त व्यक्ती देखील योग्य उपचार आणि काळजी घेऊन दीर्घ निरोगी आयुष्य जगू शकते. मात्र, यासाठी ते योग्य वेळी ओळखता येणे महत्त्वाचे आहे आणि त्यासाठी एड्सच्या सुरुवातीच्या लक्षणांची माहिती असणे आवश्यक आहे. या लेखात आम्ही तुम्हाला याबद्दल योग्य माहिती देण्याचा प्रयत्न करत आहोत.

**रोगप्रतिकारक शक्तीचे मोठे नुकसान**

एड्स रोग एचआयव्ही (ह्यूमन इम्युनोडेफिशियन्सी व्हायरस) विषाणूमुळे होतो ज्यामुळे आपल्या शरीराच्या रोगप्रतिकारक शक्तीचे मोठे नुकसान होते. अशा स्थितीत शरीर रोगांशी लढण्याची नैसर्गिक शक्ती गमावून बसते आणि पीडित व्यक्ती हळूहळू असहाय्य बनते. या आजारावर आजपर्यंत योग्य उपचार शोधले गेले नाहीत. मात्र, या जीवघेण्या आजाराची योग्य वेळी ओळख झाली, तर वैद्यकीय उपचार आणि सल्ल्याने एड्सग्रस्त व्यक्तीचा त्रास बऱ्याच अंशी कमी होऊ शकतो. जाणून घेऊया एचआयव्हीच्या सुरुवातीच्या लक्षणांबद्दलष्ठ

**ताप**

एचआयव्ही संसर्गाच्या २-३ आठवड्यांच्या आत एखाद्या व्यक्तीला विषाणूजन्य तापाची लक्षणे दिसू शकतात. त्यामुळे सामान्य ताप समजून त्याकडे दुर्लक्ष करण्याची चूक करू नका.

**डोकेदुखी**

एचआयव्हीच्या सुरुवातीच्या लक्षणांमध्ये सतत डोकेदुखीचा समावेश होतो. त्यामुळे एखाद्या व्यक्तीला विनाकारण दीर्घकाळ डोकेदुखीची समस्या भेडसावत असेल, तर त्याबाबत गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे.

**रात्री घाम येणे**

एचआयव्ही संसर्गाने ग्रस्त असलेल्या व्यक्तीला रात्री घाम येण्याची समस्या देखील येऊ शकते. त्यामुळे जर तुम्हाला रात्री असामान्यपणे घाम येत असेल तर तुम्ही सतर्क राहणे आवश्यक आहे.

**वजन कमी होणे**

एचआयव्ही संसर्ग झालेल्या व्यक्तीचे वजनही झपाट्याने कमी होते. जर कोणाला विनाकारण वजन कमी करण्याची समस्या भेडसावत असेल तर त्यालाही याबाबत सतर्क राहण्याची गरज आहे.

**थकवा**

एचआयव्ही संसर्गामुळे व्यक्तीला जास्त थकवाही जाणवतो. त्यामुळे कोणताही शारीरिक व्यायाम न करता थकवा जाणवत असेल तर त्याचा गांभीर्याने विचार करावा.

**मानेला सूज**

एचआयव्ही संसर्गामुळे लिम्फ नोड्समध्ये सूज येण्याची समस्या देखील उद्भवते. अशा परिस्थितीत, याचा त्रास झालेल्या लोकांना त्यांच्या मान, कंबर किंवा काखेत सूज येऊ शकते. काही काळानंतर हे नोड्सही लहान होतात. अशा परिस्थितीत, सुरुवातीच्या टप्प्यातच अशा नोड्सबाबत निश्चितपणे जागरूकता आहे.

**त्वचेवर पुरळ उठणे**

एचआयव्ही विषाणू प्रथम संक्रमित व्यक्तीच्या रोगप्रतिकारक शक्तीवर परिणाम करतो, ज्याचा बराचसा भाग त्वचेवर दिसून येतो. अशा परिस्थितीत पीडितेच्या त्वचेवर पुरळ, पुरळ आणि असामान्य खुणा दिसू शकतात.

**सतर्क राहणे आवश्यक**

म्हणून, जर एखाद्या व्यक्तीला त्याच्या त्वचेत आणि शरीरात असे असामान्य बदल दिसून येत असतील तर त्याने त्याबद्दल सतर्क राहणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत, लवकरात लवकर एचआयव्ही चाचणी करणे चांगले होईल जेणेकरून त्याचे उपचार वेळेवर सुरू होऊ शकतील.

## किडनी आणि लिव्हर साफ करण्यासाठी सकाळी प्या 'हे' ड्रिंक्स, शरीरावरील सूजही कमी होईल

आजकाल बदलेली जीवनशैली, प्रदूषण आणि जंक फूड खाण्यामुळे आपल्या शरीरात विषारी पदार्थ जमा होऊ लागतात. लिव्हर आणि किडनी शरीरातील कचरा फिल्टर करण्यास जबाबदार असतात. म्हणून, हे विषारी पदार्थ हळूहळू त्यांच्यामध्ये जमा होऊ लागतात आणि त्यांच्या कार्यावर परिणाम करू लागतात.

यामुळे थकवा, पचन समस्या आणि इतर अनेक समस्या उद्भवू शकतात. म्हणून, यकृत आणि मूत्रपिंडांना डिटॉक्स करणे खूप महत्वाचे आहे. आज आपण अशा ५ पेयांबद्दल जाणून घेऊया जे यकृत आणि मूत्रपिंडात जमा होणारा कचरा साफ करण्यास मदत करतात.

**लिंबू आणि आल्याचे पाणी-**

लिंबू आणि आल्याचे पाणी अँटीऑक्सिडंट्स आणि अँटी इन्फ्लीमेंट्री गुणधर्मांनी समृद्ध आहे. ते यकृत आणि मूत्रपिंडातील जळजळ कमी करतात. त्यांना फ्री रॅडिकल्सच्या नुकसानापासून वाचवतात आणि पचन सुधारतात. हे पेय पिण्यामुळे यकृत आणि मूत्रपिंडातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत होते. हे पेय बनवण्यासाठी, एका ग्लास कोमट पाण्यात अर्धा लिंबू पिळून घ्या आणि किसलेले आले एक इंच घाला. सकाळी रिकाम्या पोटी हे पाणी प्या.

**बीट आणि गाजराचा रस-**

बीट यकृतातील साचलेल्या विषारी पदार्थांपासून शुद्ध करण्यासाठी उत्कृष्ट आहे. त्यात असलेले संयुगे विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करतात. गाजरातील फायबर यकृत आणि मूत्रपिंडांसाठी देखील फायदेशीर आहे. हा रस बनवण्यासाठी, एक बीट आणि दोन गाजर ब्लेंडरमध्ये बारीक करा, रस काढा, चवीनुसार लिंबू आणि काळे मीठ घाला आणि सकाळी प्या.

**धण्याचे पाणी-**

धण्यामध्ये अँटी इन्फ्लीमेंट्री गुणधर्म असतात. जे शरीरातील जळजळ कमी करण्यास आणि यकृत आणि मूत्रपिंड निरोगी ठेवण्यास मदत करतात. धणे पाणी वजन कमी करण्यास देखील मदत करते. हे पेय बनवण्यासाठी, दोन चमचे धणे रात्रभर एका ग्लास पाण्यात भिजवून ठेवा, गाळून घ्या आणि सकाळी प्या.

**ग्रीन टी-**

ग्रीन टीमध्ये कॅटेचिन असतात, जे शक्तिशाली अँटिऑक्सिडंट्स आहेत. ते फ्री रॅडिकल्सच्या नुकसानापासून संरक्षण करते. ते मूत्रवर्धक म्हणून देखील कार्य करते, मूत्रपिंडातील विषारी पदार्थ मूत्रमार्गे बाहेर काढण्यास मदत करते. ग्रीन टी चयापचय वाढविण्यास देखील मदत करते. ग्रीन टी बॅग एका कप गरम पाण्यात २-३ मिनिटे भिजवा आणि साखर किंवा इतर कोणत्याही गोडवाशिवाय प्या. तुम्ही दिवसभरात एक ते दोन कप ग्रीन टी पिऊ शकता. या प्रमाणापेक्षा जास्त सेवन करू नका.

## विकास सेवा संस्था सक्षम असणे आवश्यक – सहकार मंत्री बाबासाहेब पाटील




**नागपूर/प्रतिनिधी :** शेतकऱ्यांना कर्ज मिळावे यादृष्टीने विकास सेवा संस्था सक्षम असणे आवश्यक आहे. या अनुषंगाने एका महसूली गावात एकापेक्षा जास्त संस्था उघडण्यात येत नाहीत. तथापि पहिल्या संस्था सक्षम असतील तर नवीन विकास संस्था स्थापन करण्याचे निर्देश देण्यात येतील, असे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी विधान परिषदेत सांगितले.

सदस्य प्रवीण दरेकर यांनी या संदर्भातील लक्षवेधी सूचना मांडली होती. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री निरंजन डावखरे, प्रसाद लाड यांनी सहभाग घेतला.

याबाबत अधिक माहिती देताना मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले, अहिल्यानगर जिल्ह्याच्या जामखेड तालुक्यातील नियोजित पुण्यश्लोक विविध कार्यकारी सहकारी विकास सेवा संस्थेस जिल्हा मध्यवर्ती सहकार बँक मर्यादित अहिल्यानगरच्या अरणगाव, ता. जामखेड शाखेत खाते उघडून देण्यासह कर्ज पुरवठा करण्याबाबत निर्देश देण्यात येतील.

## लातूर जिल्ह्यात शनिवारी राष्ट्रीय लोकअदालत

**लातूर/प्रतिनिधी :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार लातूर जिल्हा व सत्र न्यायालय, तसेच लातूर जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयात शनिवार, १३ डिसेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आलेले आहे. लोक अदालतीमध्ये दोन्ही पक्षकारांच्या संमतीने प्रकरण निकाली काढल्यास न्यायालयीन शुल्क तथा कोर्ट फी परत मिळते. त्यामुळे पक्षकार व विधीज्ञ यांनी १३ डिसेंबर रोजीच्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये आपली प्रकरणे आपसी तडजोडीने निकाली काढावीत, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय जे. भारूका, तसेच सचिव व्यंकटेश गिरवलकर यांनी केले आहे.

या लोकअदालतीमध्ये प्रलंबित तडजोडीस पात्र दिवाणी व फौजदारी प्रकरणे, परकाम्य संलेख अधिनियम कलम १३८ धनादेश अनादरीत प्रकरणे, भूसंपादन प्रकरणे, कौटुंबिक प्रकरणे, मोटार वाहन अपघात दावा प्रकरणे, दरखास्त प्रकरणे, कामगार तथा औद्योगिक न्यायालयातील प्रकरणे, बँकेशी संबंधीत अशी एकूण १२ हजार ३८४ प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत. तसेच बँक वित्तीय संस्था, मालमत्ता कर वसुली वाद दाखलपूर्व ११ हजार ७३५ प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत. राष्ट्रीय लोक अदालतमध्ये पक्षकारांना आपली बाजू मांडण्यासाठी संधी मिळते. तसेच दोन्ही पक्षकारांना मान्य असलेली तडजोड पक्षकारांच्या आपसी संमतीने होते. लोक अदालतमध्ये प्रकरण आपसी संमतीने निकाली निघाल्यास पक्षकारांचा वेळ व पैसा वाचतो. तरी पक्षकार, विधिज्ञ यांनी राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये आपली प्रकरणे आपसी तडजोडीने निकाली काढावीत, असे करण्यात आले आहे.

## चन्नबसवेश्वर फार्मसी महाविद्यालयाचे अविष्कार स्पर्धेत उज्वल यशाची परंपरा कायम



**लातूर/प्रतिनिधी :** अविष्कार संशोधन स्पर्धा २०२६ मध्ये चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर येथील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी करत महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत विद्यापीठस्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धा गणितशास्त्र संकुल, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेडच्या वतीने आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत महाविद्यालयातील पदवी, पदव्यूत्तर पदवी व पोस्ट पदव्यूत्तर पदवी स्तरातून जिल्हस्तरीय विजेत्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेत मेडिसिन अँड फार्मसी विभागात पोस्ट पदव्यूत्तर पदवी स्तरावर महेश मानके यांनी प्रथम क्रमांक पटकावला असून त्यांना मार्गदर्शक म्हणून डॉ. ओमप्रकाश भुसनुरे यांनी मार्गदर्शन केले. तसेच जान्हवी कैले हिने कृषी व पशुसंवर्धन विभागात पदव्यूत्तर पदवी स्तरावर तृतीय क्रमांक मिळवून कॉलेजचा गौरव वाढविला असून तिला प्रा. दिक्षा विभुते यांचे मार्गदर्शन लाभले.विद्यार्थ्यांच्या या शानदार यशाबद्दल संस्थेचे सचिव श्री. भीमाशंकर देवनीकर, विश्वस्त श्री. विजयकुमार मठपती, श्री. अरुणप्पा हालकुडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी, डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, डॉ. अनंत देशपांडे, डॉ. शिवप्पा नागोबा, डॉ. विवेक पंचभाई, डॉ. पद्मजा गिराम, डॉ. राम साखरे, डॉ. सुनील हिंडोळे, डॉ. शिवकुमार लद्दे, डॉ. नशीर शेख, शिवहार विभुते, सिद्धेश्वर स्वामी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या पुढील जानेवारी महिन्यामध्ये होणाऱ्या राज्यस्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## सत्यजीत तांबेंची लक्षवेधी, महसूल मंत्र्यांकडून थेट अधिकाऱ्यावर कारवाई, विधान परिषदेत काय झाले?

**नागपूर/प्रतिनिधी :** नाशिक पदवीधरचे आमदार सत्यजीत तांबे यांच्या लक्षवेधीवर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तातडीने पावले उचलत थेट उपनिबंधक अधिकाऱ्याची बदली केली. सत्यजीत तांबे यांनी विधान परिषदेमध्ये संगम नेरच्या इंदिरानगरमधील रहिवाशांच्या घराच्या नोंदणीची लक्षवेधी उपस्थित केली होती. त्यानंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बदलीचा आदेश जारी केला.इंदिरानगरमधील सुमारे ७७२ नागरिकांच्या पोकळी हिस्सा नोंदी पुढील तीन दिवसात युद्ध पातळीवर पूर्ण करतील. यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ वापरून, नोंदणी महानिरीक्षक सर्व नोंदी पूर्ण करतील, असे महसूल मंत्री यांनी स्पष्ट केले. संगमनेरमधील प्रलंबित मालमत्ता नोंदणी प्रश्न खूप गंभीर आहे. उपनिबंधक नागरिकांशी अरेरावीची भाषा करतात. राजकीय हेतूने जाणीवपूर्वक नोंदी घेण्यास टाळाटाळ करतात असे नमूद करत सत्यजीत तांबे यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

# राज्य शासनाच्या कारभारातील पारदर्शकता हरवली आहे

## संपूर्ण महाराष्ट्राला न्याय देणाऱ्या योजना शासनाने राबवाव्यात

### माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख

**नागपूर/प्रतिनिधी :** आगामी काळात नाशिक येथे होवू घातलेल्या कुंभमेळाव्यासाठी राज्यशासनाने हजारो कोटीची तरतूद केली आहे. या निधीचा विनीयोग पारदर्शकतेने व्हावा. यावर्षी अतिवृष्टीने सर्वच लहानमोठया शहरातील मुलभुतसुवींधाचा बोजवारा उडाला त्यामुळे आगामी काळात संभाव्य संकटाचा विचार करुन सोयीसुवीधांची उभारणी करावी. मोठया शहराप्रमाणेच लातूर सारख्याशहरातही पार्कीग, सिंग्नल, शहरवाहतुक बस, पाणीपुरवठा कचराव्यवस्थापन या सुवींधासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन दयावा, अशा सुचना नोंदवून राज्याचे माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशना दरम्यान तिसऱ्या दिवशी सभागृहात नगरविकास विभागाने सादर केलेल्या पुरवणी मागण्या संपूर्ण महाराष्ट्राला न्याय देणाऱ्या नसल्याचे सांगीतले व त्यास विरोध दर्शवला.


महाराष्ट्र विधानसभेच्या नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशन दरम्यान नगर विकास विभागाने सादर केलेल्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत सहभागी होतांना माजी मंत्री, आमदार, अमित विलासराव देशमुख म्हणाले की, आगामी काळातील नाशिक येथे होवू घातलेल्या कुंभ मेळाव्यासाठी हजारो कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या निधीच्या विनीयोगात पारदर्शकता राहायला हवी. अलीकडील काळात महाराष्ट्रात पारदर्शकता हरवल्याचे चित्र आहे. त्यामुळे या कुंभमेळाव्यात विशेष काळजी घ्यावी. तपोवनमधील वृक्ष तोडीला अनेकांनी विरोध दर्शविला आहे, सरकारकडून या बाबतीत योग्य भुमिका घ्यायला हवी.

सदया इंडिगो विमान सेवा विस्कळीत झाली आहे अनेकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. महाराष्ट्राच्या मर्यादेत येथील सरकारने पुढाकार घेऊन जनतेचा त्रास कमी करायला हवा होता तसा प्रयत्न झाल्याचे दिसत नाही. किमान आगामी काळात तरी सरकारने अशा प्रसंगात विशेष काळजी घ्यायला हवी. राज्यातील मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर सारख्या अनेक मोठ्या शहरांचा कायापालट होत आहे त्यासाठी हजारो लाखो कोटी खर्च केले जात आहेत. असे सरकार सांगत आहे परंतू अलीकडे झालेल्या अतिवृष्टीमुळे शहरात उभारलेल्या सुवीधा कुजकामी ठरल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आगामी काळात अशा सुवीधा उभारतांना नव्याने विचार करावा लागणार आहे.

शहरीवस्त्यांमध्ये बिबट्याचे प्रमाण वाढले आहेत, भटक्या कुत्रयाचे प्रश्न निर्माण झाले आहेत, कबुंतराचे प्रश्न चर्चेत आले आहेत अशा प्रकारचे प्रश्न सोडवण्यासाठी शासनाने आता गाभीर्यपूर्वक विचार करायला हवे आहे.

लातूर शहरात वाहनतळ, सिंग्नल व्यवस्था उभारुन वाहतुकीला शिस्त लावावी या प्रसंगी बोलतांना माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी लातूर शहरातील अनेक समस्यांचा उहापोह करीत लातुर मनपातील कारभाराबद्दल ताशेरे ओढले. ते म्हणाले की, सुवीधांचा अभाव आणि मनपा प्रशासनातील गोधळ यामुळे शहरात वाहतुक कोडी होत आहे. पार्कीगची समस्या निर्माण झाली आहे ती सोडवण्यासाठी वाहनतळ उभारणे, शहर वाहतुक सेवेचा विस्तार करणे आवयश्क आहे. बांधकाम परवाने ऑन लाईन झाले असले तरी हे परवाने ४५ दिवसांत कोणालाच मिळत नाहीत. या प्रक्रीयेत मोठा भृष्टाचार वाढला आहे परिणामी दिरंगाइने काम होत आहे. फेरीवाला धोरण राबविण्या संदर्भात लातूर मनपाला निर्देश दयावेत राज्यातील अनेक मनपा हद्दीत फेरीवाला धोरण राबविले आहे, परंतु लातुर शहरात फेरीवाला धोरन राबविले जात नाही, यात स्थानीक प्रशासन उदासीन दिसत आहे. या संदर्भाने कालबद्ध कार्यक्रम राबवण्यासाठी शासनाकडून मनपाला निर्देश देणे आवश्यक बनले आहे.

एमआयडीसी भागात एकच करप्रणाली असावी लातुर शहरातील औद्योगिक वसाहतीमधील अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, येथील उद्योजकाना मालमत्ता कर तसेच औद्योगिक कर असे दोन कर आकारले जात आहेत, यात नगरविकास विभागाने लक्ष घालून एकच कर राहील याची व्यवस्था करावी.




**लातूरातील कबालेचे प्रश्न मार्गी लागवेत**

लातुर शहरातील विलास नगर, टेंचिंग ग्राउंड, संजय नगर, कुष्ठधाम, राजीव नगर, कॉईल नगर, इंदिरा नगर सारख्या शहरातील अनेक ठिकाणी नागरिकांना कबाले मिळालेले नाहीत यासाठी नगरविकास विभागाने लातुर मनपा प्रशासनाला आदेशीत करून लातुर शहरातील विविध भागातील कबाल्याच्या वितरणाचा निवडा करावा आणि लवकरात लवकर कबाले वितरण व्हावे यासाठी सूचना कराव्यात. गृहनिर्माण योजनेचा विस्तार केवळ मुंबई, पुणे, ठाणे, छत्रपती संभाजी नगर सारख्या मोठ्या शहरात झाला असल्याचे दिसून येते पण या प्रमाणेच राज्यातील लातुर, परभणी, नांदेड, धाराशिव सारख्या शहरात देखील गृहनिर्माण योजनेचा विस्तार व्हावा अशी सुचना आमदार देशमुख यांनी केली.

राज्यातील अनेक शहरात स्लॉटर हाऊसचे प्रश्न प्रलंबित असून यामुळे धर्माधर्मात तेढ निर्माण होत आहे आणि म्हणूनच राज्य सरकारने लातुरसह सबंध राज्यातील स्लॉटर हाऊस संदर्भात तातडीने निर्णय घेऊन या व्यवस्था उभाराव्यात. राज्यातील अनेक शहरे तसेच ग्रामीण भागातील अनेक गावच्या पाणी पुरवठा योजना निधी अभावी रखडल्या असल्याचे दिसून येत आहे. शासनाने पुरेसा निधी उपलब्ध करुन रखडलेल्या पाणी पुरवठा, स्वच्छता, मलनिस्सारणाच्या योजना मार्गी लावाव्यात अशी मागणी आमदार देशमुख यांनी केली.

आपल्या भाषणाच्या शेवटी शासनाने सादर केलेल्या नगरविकास विभागाच्या पुरवणी मागण्या संपूर्ण महाराष्ट्राला न्याय देणाऱ्या नसल्याचे नमुद करुन आपण विरोध दर्शवत असल्याचे आमदार देशमुख यांनी सांगीतले.

# कोल्हापुरी चपलांच्या जागतिक प्रसारासाठी प्राडा, लिडकॉम आणि लिडकार यांच्यात सामंजस्य करार

### पारंपारिक कोल्हापुरी कौशल्याला प्राडाची आधुनिक साथ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय पारंपरिक चर्मकला कोल्हापुरी चपलांचा वारसा जगभर पोहोचवण्यासाठी जागतिक ब्रॅन्ड प्राडा, लिडकॉम (संत रोहिदास चर्मउद्योग आणि चर्मकार विकास महामंडळ) आणि लिडकार (डॉ. बाबू जगजीवनराम चर्मउद्योग विकास महामंडळ) यांच्यात सामंजस्य करार झाला. मुंबईतील इटालियन वाणिज्य दूतावासात, इटलीभारत व्यापारी परिषदेनिमित्त या करारावर स्वाक्षरी करण्यात आली. शतकांपासून वापरात असलेल्या पारंपरिक चप्पल निर्मितीच्या पद्धती, प्राडाच्या आधुनिक व समकालीन डिझाईन शैली या माध्यमातून चप्पल विकसित केल्या जात आहेत. पारंपरिक कौशल्य आणि आधुनिक लक्झरी फॅशनच्या मदतीने पारंपारिक कोल्हापुरी कौशल्याला प्राडाची आधुनिक साथ मिळणार आहे. विशेष चप्पला फेब्रुवारी २०२६ मध्ये प्राडाच्या ४० विक्री केंद्रांमध्ये तसेच अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

या उपक्रमासाठी महाराष्ट्र शासनाचे ठोस पाठबळ लाभले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांचे सक्रिय मार्गदर्शन मिळाले आहे. हा करार प्रधान सचिव तथा लिडकॉमचे अध्यक्ष डॉ. हर्षदीप कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि लिडकॉमच्या व्यवस्थापकीय संचालक प्रेरणा देशभ्रतार यांच्या धोरणात्मक नियोजनामुळे शक्य झाला आहे.



सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट म्हणाले, या कराराने भारतातील अनेक कारागीर, व्यावसायिक आणि उद्योजकांचा फायदा होणार आहे. या विशेष संकलनातून भारतीय कारागिरांच्या कलेला नवी दिशा मिळणार असून आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्या कौशल्याची ओळख अधिक दृढ होणार आहे.

लिडकॉमच्या व्यवस्थापकीय संचालक प्रेरणा देशभ्रतार म्हणाल्या, पारंपरिक कला जपणाऱ्या कारागिरांच्या पिढ्यांचा सन्मान करण्यासाठी आणि त्यांच्या कौशल्याला जागतिक पातळीवर योग्य ओळख देण्यासाठी ही भागीदारी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. यात एक जागतिक ब्रँड थेट महाराष्ट्र आणि कर्नाटकातील कारागिरांसोबत काम करत असल्याने त्यांच्या या कौशल्याला एक ओळख मिळेल आणि कलेचे पूर्ण श्रेय या कारागिरांना मिळेल. लिडकारच्या व्यवस्थापकीय संचालक संचालिका डॉ. के. एम. वसुंधरा म्हणाल्या, कोल्हापुरी चपलांची परंपरा म्हणजे महाराष्ट्रकर्नाटकातील चप्पलकारांचे शतकांपासूनचे संचित कौशल्य या सहकार्यामुळे प्रशिक्षण, रोजगार आणि जागतिक संधींची विस्तृत दारे उघडणार आहेत.

प्राडा समूहाच्या सामाजिक उत्तरदायित्व विभागाचे प्रमुख लोरेंझो बर्टेली म्हणाले, ही भागीदारी म्हणजे सांस्कृतिक आदानप्रदानाची नवी ओळख आहे. भारतीय कारागिरांच्या अतुलनीय कलेला आधुनिक जगात योग्य स्थान देण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. चपलांच्या कलेक्शनच्या माध्यमातून भारतीय कारागिरीचा प्राडा मेड इन इंडिया इन्स्पायर्ड बाय कोल्हापुरी चप्पल्स प्रकल्पाचा आराखडा, अंमलबजावणी आणि त्या संदर्भातील मार्गदर्शक तत्वे या करारात नमूद करण्यात आली आहेत. महाराष्ट्र आणि कर्नाटकातील पारंपरिक कोल्हापुरी चपला तयार करणाऱ्या कुशल कारागिरांच्या साह्याने या चपला भारतात बनवल्या जातील. या चपला बनवण्याच्या पारंपरिक पद्धती आणि प्राडाच्या समकालीन डिझाइन्स तसेच प्रीमिअम दर्जाच्या मटेरिअलच्या साह्याने या कलेक्शनच्या माध्यमातून भारतातील संपन्न वारसा आणि आधुनिक लक्झ्यरी फॅशनची अभिव्यक्ती यात एका नवा संवादाला सुरुवात केली जाणार आहे.

पारंपरिक कोल्हापुरी चपला महाराष्ट्रातील चार जिल्हे (कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर) आणि कर्नाटकातील चार जिल्हे (बेळगावी, बागलकोट, धारवाड, बिजापूर) २०१९ या आठ जिल्ह्यांमध्ये बनवल्या जातात. मध्ये कोल्हापुरी चपलांना जिओग्राफिकल इंडिकेशन (जीआय) टॅग देण्यात आल्याने त्यांची अस्सलता जपली गेली आणि त्यांचे सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित झाले.

## अहिल्यानगरमध्ये शाळा, महाविद्यालयांलगत ३३८ अनधिकृत पानटपऱ्या; पोलिसांचे सर्वेक्षण

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयांलगत १०० मीटर अंतरात असलेल्या अनधिकृत पानटपऱ्यांचे पोलीस प्रशासनाकडून सर्वेक्षण करण्यात आले. त्यामध्ये जिल्ह्यातील ३२ पोलीस ठाण्यांच्या हद्दीमध्ये अशा एकूण ३३८ पानटपऱ्या आढळल्या आहेत. आता या अनधिकृत पानटपऱ्या हटवण्याची मोहीम पोलिसांनी स्थानिक प्रशासनाच्या मदतीने सुरू केली आहे.

अहिल्यानगर शहरासह जिल्हाभरातील शाळा व महाविद्यालयांच्या १०० मीटर परिसरातील अनधिकृत पानटपऱ्यांची सर्वेक्षण पोलीसांकडून करण्यात आले. त्यानुसार ३२ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत ३३८ पानटपऱ्या आढळल्या आहेत. या पानटपऱ्या हटवण्याचे आदेश जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिले आहेत. त्यानुसार संबंधित पोलीस ठाण्यांनी स्थानिक प्रशासनाच्या मदतीने या पानटपऱ्या हटवण्याची कारवाई काल, बुधवारपासून सुरू केली. याअंतर्गत अहिल्यानगर शहरातील ३ पानटपऱ्या हटवण्यात आल्या. आज, गुरूवारपासून ही मोहीम पूर्ण क्षमतेने राबवणार असल्याचे महापालिकेकडून सांगण्यात आले.

# नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा २०२७ : बोधचिन्ह स्पर्धेत सहभागासाठी आता राहिले फक्त दहा दिवस

- ➤ जास्तीत जास्त नागरिकांनी २० डिसेंबरपर्यंत प्रवेशिका पाठविण्याचे प्राधिकरणाचे आवाहन
- ➤ सर्वोत्कृष्ट बोधचिन्हास मिळणार तीन लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक

**नाशिक/प्रतिनिधी :** श्रद्धा, पावित्र्य आणि अध्यात्माचा संगम असलेला सिंहस्थ कुंभमेळा नाशिक त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये होणार आहे. यानिमित्त नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणातर्फे बोध चिन्ह स्पर्धेचे (लोगो डिझाईन) आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभाग नोंदविण्यासाठी आता अवघे दहा दिवस राहिले आहेत. त्यामुळे या स्पर्धेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे अनुक्रमे तीन, दोन आणि एक लाख रुपयांच्या पारितोषिकांसह प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी २० डिसेंबर, २०२५ पर्यंत प्रवेशिका पाठविता येणार आहेत, असे विभागीय आयुक्त तथा नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम यांनी कळविले आहे.

नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणारा सिंहस्थ कुंभमेळा हा जगातील सर्वात मोठ्या आध्यात्मिक मेळाव्यांपैकी एक आहे. तो दर बारा वर्षांनी एकदा राज्यातील नाशिक जिल्ह्यातून वाहणाऱ्या दक्षिण गंगा अर्थात गोदावरी नदीच्या काठावर भरतो. अमृत मंथनाच्या आख्यायिकेत येणारा हा कुंभमेळा श्रद्धा, पवित्रता आणि नवनिर्माणाच्या शाश्वत चक्राचे प्रतीक आहे. बारा जोतिर्लिंगांपैकी एक असलेले त्र्यंबकेश्वर, नाशिकची समृद्ध संस्कृती, मंदिरे आणि घाटांचे आध्यात्मिक आणि ऐतिहासिक प्रतिबिंब या कुंभमेळ्यात दिसते.

नाशिकमधील रामायण स्थळांची भव्यता, नाशिकचे घाट, त्र्यंबकेश्वर आणि गोदावरी नदीचा शाश्वत प्रवाह दोन्ही शहरांना एकत्र जोडतो. कुंभमेळा एक चैतन्यशील आणि जागतिकस्तरावर मान्यताप्राप्त आध्यात्मिक उत्सव म्हणून वाढत असताना २१ व्या शतकाच्या आकांक्षा प्रतिबिंबित करतो. देशाच्या परंपरेत रुजलेली एक ताजी आणि गतिमान दृश्य ओळख निर्माण करण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. नवीन बोधचिन्हाची ओळख भूतकाळातील आवृत्त्यांच्या वारशावर आधारित असेल. भक्ती आणि एकतेची कालातीत भावना अशा स्वरूपात साकार करणारी पाहिजे. आधुनिक, संदर्भात्मक आणि भारत आणि जगभरातील विविध प्रेक्षकांसाठी दृश्यदृष्ट्या आकर्षक असे बोधचिन्ह असावे. एवढेच नव्हे, तर नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या संस्कृती, वारसा, स्थापत्य, विधी आणि नैसर्गिक सौंदर्यातून सहभागींना प्रेरणा मिळू शकेल. बोध चिन्ह संस्मरणीय असावे. ते सर्व व्यासपीठांवर श्रद्धा, उत्सव आणि कालातीत परंपरा व्यक्त करेल. ही रचना कुंभमेळा २०२७ साठी एक वेगळी दृश्य ओळख म्हणून काम करेल. नाशिक-त्र्यंबकेश्वरच्या आध्यात्मिक साराचे आणि भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे प्रतीक हे बोध चिन्ह असावे.

**बोधचिन्हासाठी**

- कमाल आकार ५ एमबी (पीडीएफ) असावा.
- स्पर्धेत दिलेल्या ले-आउटनुसार बोधचिन्हाची डिझाइन ए १ आकाराच्या पोस्टरवर असावे.
- बोधचिन्हाची रंगीत, कृष्णधवल प्रतिमा आणि बोधचिन्हाबाबत माहिती देणारी १५० शब्दांची टिपणी असावी.
- स्वाक्षरी केलेल्या आणि स्कॅन केलेल्या अटी आणि शर्तींची कमाल आकार १ एमबी (पीडीएफ) फाइल.
- संकल्पना टीप, पोस्टर, प्रतिमा, फाइल नावासह, अर्जदाराची ओळख स्थापित करण्यासाठी नाव, संस्थेचे नाव किंवा कोणतेही संदर्भ यासारखी कोणतीही वैयक्तिक माहिती नसावी.
- या निकषांचे पालन न करणाऱ्या नोंदी अपात्र ठरवल्या जातील.
- सहभागींनी वर नमूद केल्याप्रमाणे २ स्वतंत्र फाइल्स सादर कराव्यात. योग्यरित्या स्वाक्षरी केलेले घोषणापत्र नसल्यास, प्रवेशिका अपात्र ठरवली जाईल.
- ही स्पर्धा भारतातील प्रत्येक नागरिकांसाठी खुली आहे. डिझाइन, आर्किटेक्चर आणि कला क्षेत्रातील विद्यार्थी सहभागी होऊ शकतात.
- ही स्पर्धा व्यावसायिक डिझायनर्स, कलाकार, ब्रॅण्ड डिझायनर्स आणि नाविन्यपूर्ण कल्पना मांडू शकणाऱ्या सर्वांसाठी खुली आहे.
- प्रत्येक सहभागीला फक्त १ प्रवेशिका पाठविण्याची परवानगी राहील.
- सहभागी स्पर्धकाचे वय किमान १२ वर्षे असावे. एखाद्या गटाने प्रवेशिका दिली असेल, तर एका व्यक्तीला संघाचा प्रमुख आणि प्रवेशिका म्हणून मानले पाहिजे.
- बोधचिन्हाची दृश्य ओळख विशिष्ट ओळख घटकांसह प्रदर्शित केलेली पाहिजे.
- रंगांचा पॅलेट, दृश्य आकृतिबंध, टाइपफेस, दृश्य अँकर आणि त्याचे अनुप्रयोग जसे की, साइनेज, ब्रँडिंग, स्ट्रीट फर्निचर, प्रवेश पास, स्टेशनरी, झेंडे, व्यापारी माल इत्यादींवर दाखवले पाहिजे.
- या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी अधिक माहितीसाठी www.mygov.in किंवा ntkmalogocompetition@gmail.com या ई-मेल आयडीवर संपर्क साधावा, असे आवाहन कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. गेडाम यांनी केले आहे.